**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्तविभाग**
**विशेष बातमीपत्र**
**कोरोना महाराष्ट्र**
**सकाळी 10 वा 10 मि.**

**दिनांक – 3.03.2021** **वार : बुधवार**

---

## ठळक बातम्या

१. राज्यात उपचाराधीन संख्येच्या वाढीचं प्रमाण काहीसं कमी, मात्र चाचण्यांच्या तुलनेत बाधितांच्या प्रमाणात वाढ

२. लसीकरणासाठी पात्र नागरिकांनी सेल्फ रजिस्ट्रेशन डॉट कोविन डॉट जी ओ व्ही डॉट इन या संकेतस्थळावर नोंदणी करावी

३. पहिला कोरोना रुग्ण सापडल्याच्या वर्षपूर्तीनंतरही नियम पाळण्याबाबत गंभीरतेची गरज

४. कोरोनावरील लस घेण्यात ज्येष्ठ नागरिकांचं प्रमाण अधिक.

## राज्य कोविड

राज्यात गेल्या दोन दिवसांपासून नवीन बाधितांच्या संख्येत झालेली काहीशी घट आणि बरे होणाऱ्या रुग्णांच्या संख्येत झालेली मोठी वाढ यामुळे उपचाराधीन संख्येच्या वाढीचं प्रमाण काहीसं कमी झालं आहे. राज्यात गेल्या दोन दिवसांत कोरोना चाचण्यांच्या तुलनेत बाधितांच्या प्रमाणात कालही सलग दुसऱ्या दिवशी वाढ झाल्याचं दिसून आलं आहे. आतापर्यंत करण्यात आलेल्या कोविड-19 च्या 1 कोटी 64 लाख 21 हजार 879 चाचण्यांपैकी, काल दिवसभरात 75 हजार 539 चाचण्या झाल्या. त्यामध्ये बाधित

आढळण्याचं दैनंदिन  प्रमाण 10 पूर्णांक 40 शतांश टक्के इतकं आहे. राज्यात गेल्या दोन दिवसांच्या आकडेवारीवरून कोविड बाधितांची संख्या वाढल्याचं दिसून येत आहे. काल दिवसभरात 7 हजार 8 शे 63 रुग्णांची नवीन बाधितांची नोंद झाली. आतापर्यंत राज्यातील कोरोनाबाधित रुग्णांची एकंदर संख्या 21 लाख 69 हजार 330 झाली आहे.

राज्यात काल दिवसभरात 6 हजार 3 शे 32 जण बरे झाले असून आतापर्यंत बरे झालेल्यांची एकंदर संख्या 20 लाख 36 हजार 7 शे 90 झाली असून राज्यातलं रुग्ण बरे होण्याचं प्रमाण 93 पूर्णांक 89 शतांश टक्क्यांवर आलं आहे.

राज्यात काल 54 कोरोनाबाधित रुग्णांच्या मृत्यूंची नोंद झाली असून एकंदर मृतांची संख्या 52 हजार 2 शे 38 झाली असून मृत्युचं एकंदर प्रमाण 2 पूर्णांक 41 शतांश टक्के इतका राहिलं आहे.

दैनंदिन नवीन बाधितांमध्ये जे जिल्हे आणि महानगरपालिका काही दिवसांपूर्वी एक अंकी होत्या त्या आता दुहेरी आकडा दाखवत आहेत. यावरूनच कोरोनाचा संसर्ग पुन्हा एकदा वाढल्याचं स्पष्ट होत आहे. सर्वाधिक संख्या मुंबई महानगरपालिका क्षेत्रात नोंदवली गेली असून तिथे ही संख्या 8 शे 49 , नागपूर मनपा 8 शे 9 तर पुणे मनपा क्षेत्रात मात्र 1 मार्चच्या तुलनेत बाधितांच्या संख्येत 2 शे 76 ने वाढली असून ती 7 शे 3 झाली  आहे. सर्वांत कमी बाधित कोल्हापूर जिल्ह्यात असून तिथे केवळ तीन  नव्या बाधितांची नोंद झाली. सध्या राज्यात उपचाराधीन असणा-या रुग्णांची संख्या 79 हजार 93 आहे.

**लसीकरण नियोजन**

कोरोना प्रतिबंधक लसीकरणाचा तिसरा टप्पा सोमवारपासून सुरु झाला आहे. या टप्प्यात 45 ते 59 वयोगटातील सह व्याधीग्रस्त व्यक्ती आणि 60 वर्षापुढील ज्येष्ठ नागरिकांना कोरोना लस टोचण्यात येत आहे. परंतु, नियोजनाचा मोठा अभाव  असल्याचे दिसून येत आहे. लसीकरणासाठी पात्र असलेल्या नागरिकांनी सेल्फ रजिस्ट्रेशन डॉट कोविन डॉट जी ओ व्ही डॉट इन (selfregistration.cowin.gov.in) या संकेतस्थळावर नोंदणी करावी,

असे आवाहन राज्याच्या आरोग्य विभागाचे उपसंचालक डॉक्टर संजय देशमुख यांनी केलं आहे .

**राज्य लसीकरण**

राज्यात काल रात्री साडेआठ वाजेपर्यंत 594 लसीकरण केंद्रामधून एकंदर 33 हजार 44 जणांना लस टोचण्यात आली. त्यापैकी 26 हजार 522 जणांना पहिली मात्रा तर 6 हजार 522 जणांना दुसरी मात्रा देण्यात आली. तर 5 हजार 822 आरोग्य कर्मचारी तर 4 हजार 589 आघाडीवर कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्याचं लसीकरण करण्यात आले . त्याचबरोबर 6 हजार 507 आरोग्य कर्मचाऱ्याना लसीची दुसरी मात्रा देण्यात आली. आतापर्यंत एकंदर 12 लाख 66 हजार 108 जणांना लस टोचण्यात आली आहे. 31 हजार 964 लाभार्थ्यांना कोविशिल्ड तर 1 हजार 80 जणांना कोवॅक्सिन लस देण्यात आली असल्याची माहिती राज्याच्या आरोग्य विभागाकडून देण्यात आली आहे. तर 1 मार्चपासून सहव्याधी असणा-या व्यक्ती आणि 60 वर्षापुढील नागरिकांसाठी सरकारी तसेच खासगी आरोग्य संस्थमध्ये लस टोचण्यात येत आहे. काल 45 ते 60 वर्षे वयोगटातील 3 हजार 813 व्यक्तीना तर 60 वर्षापुढील 12 हजार 299 ज्येष्ठ नागरिकांना पहिली मात्रा देण्यात आली.

**मुंबई लसीकरण**

मुंबईत काल कोविड प्रतीबंधात्मक लसीकरणाच्या दुस-या दिवशी मोठ्या प्रमाणात ज्येष्ठ नागरिकांची गर्दी दिसून आली तर बेस्ट अर्थात बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहनच्या जवळपास 50 टक्के बस चालक, वाहक आणि आघाडीच्या इतर कर्मचाऱ्यांना कोरोना प्रतिबंधात्मक लस टोचण्यात आली. आतापर्यंत 16 हजार कर्मचाऱ्यांना लस टोचण्यात आली असल्याची माहिती बेस्टचे मुख्य वैद्यकीय अधिकारी अनिलकुमार सिंगल यांनी सांगितलं. तर गेल्या ३ दिवसांपासून बेस्टचा एकही कर्मचारी कोरोना बाधित आढळला नसल्याच त्यांनी सांगितलं. लसीवरील विविध अफवांबद्दल कर्मचाऱ्यांमध्ये जागरूकता अभियान चालविण्यासंदर्भात बेस्टने मुंबई महापालिकेला पत्र लिहिले असून बेस्टच्या

कर्मचाऱ्यांसाठी 7 मार्च रोजी जागरूकता शिबिराचे आयोजन करण्यात येणार असल्याचं महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी म्हटलं आहे.

## पुणे गलथान

राज्यातील कोरोनाचा पहिला रुग्ण पुण्यात सापडल्याच्या घटनेला या महिन्यातच एक वर्ष पूर्ण होत असून वर्षभरातील कोरोना प्रादुर्भावाच्या  कटू आठवणीतून अजूनही आपण काही शिकल्याचं दिसून आलेलं नाही. पुणे आणि परिसरात गेल्या काही दिवसांपासून लागू असलेले रात्रीचे निर्बंध सर्रास धाब्यावर बसवण्याचेच प्रकार सुरु असून त्यामुळं पुन्हा एकदा कोरोनाचा प्रादुर्भाव वाढला तर  कोण असा प्रश्न आता निर्माण झाला आहे त्याबद्दलचा हा विशेष वृत्तांत

पुणे शहर आणि जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेऊन खबरदारीचा उपाय म्हणून रात्री 11 ते सकाळी 6 वाजेपर्यंत अनेक प्रकारचे निर्बंध जारी करण्यात आले असले तरी प्रत्यक्षात मात्र त्याची अंमलबजावणी प्रभावीपणे होताना दिसून आलेली नाही त्यामुळं भविष्यात रुग्णांची संख्या वाढल्यास आणि टाळेबंदीसारखे उपाय योजावे लागल्यास त्याला जबाबदार कोण असा प्रश्न निर्माण झाला आहे . उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत गेल्या महिन्यात झालेल्या आढावा बैठकीत कोरोनाच्या वाढत्या प्रादुर्भावाबद्दल चिंता व्यक्त करण्यात येऊन 22 फेब्रुवारी पासून रात्रीची मर्यादित स्वरूपाची संचारबंदी लागू करण्यात आली मात्र त्यानंतरही प्रत्यक्षात शहराच्या अनेक भागाबरोबरच शहरालगतच्या परिसरातही त्याची अंमलबजावणी होताना दिसत  नाही . नागरिकांकडूनही या निर्बंधांना केराची टोपली दाखवल्यासारखी परिस्थिती दिसत आहे . अनेक हॉटेल रात्री उशिरापर्यंत सुरु असून रात्री 12 नंतरही तरुणाई विनामास्क बाहेर फिरताना दिसून आलेली आहे . रात्री उशिरा बाहेर गावाहून परत येणाऱ्यांची साधी चौकशी देखील होत असताना दिसत नाही .या सर्वांचा  एकत्रित परिणाम शहर आणि जिल्ह्यातील कोरोना रुग्णांची संख्या वाढण्यात झाला आणि परिणामी टाळेबंदीसारखी कठोर उपाय योजना लागू करण्याची वेळ आल्यास बेजबाबदार नागरिकांबरोबरच गलथान प्रशासनही त्याला जबाबदार असेल अशी सार्वत्रिक प्रतिक्रिया आता व्यक्त होऊ लागली आहे .

## परभणी

परभणी जिल्ह्यात कोरोना संसर्गाच्या वाढत्या प्रादूर्भावाच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने टाळेबंदी संदर्भात सुरू केलेल्या हालचालींना व्यापाऱ्यांसह अन्य उद्योजकांनी तीव्र विरोध केला आहे. या संदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयात काल जिल्हाधिकारी दीपक मुगळीकर यांच्या अध्यक्षतेखाली एका बैठकीचं आयोजन करण्यात आलं होतं. त्यावेळी व्यापाऱ्यांनी टाळेबंदीला विरोध दर्शवित रात्रीच्या संचारबंदीस मात्र सहमती दर्शविली आहे. कोरोनाची साखळी तोडण्यासाठी किमान 7 दिवसांच्या टाळेबंदीची आवश्यकता असल्याच्या मुद्द्यावर मत विचारले असता ; गेल्या वर्षभरापासून संपूर्ण व्यवहार पूर्णतः विस्कळीत झाले असून पुन्हा टाळेबंदी नको असल्याचं व्यापाऱ्यांनी म्हटलं आहे.

## कोरोना पुणे विभाग

पुणे महसूल विभागातील पुणे , सातारा , सांगली , कोल्हापूर आणि सोलापूर या जिल्ह्यातील 5 लाख 90 हजार 625 कोरोना बाधित रुग्ण बरे होऊन घरी गेले आहेत. त्यामुळे बरे होणा-या रुग्णांचे प्रमाण 95 पूर्णांक 28 शतांश टक्के झालं आहे. विभागात कोरोना बाधीत रुग्णांची संख्या 6 लाख 19 हजार 854 झाली आहे. तर 12 हजार 866 रुग्ण उपचाराधीन आहेत. कोरोनाबाधीत एकंदर 16 हजार 3 शे 63 रुग्णांचा मृत्यू झाला असून मृत्यूचे प्रमाण 2 पूर्णांक 64 शतांश टक्के असल्याची माहिती विभागीय आयुक्त सौरभ राव यांनी दिली आहे.

## लातूर

कोरोना संसर्गाच्या वाढत्या पार्श्वभूमीवर लातूर जिल्ह्यातील लातूर शहर महानगरपालिका, औसा, निलंगा, उदगीर आणि अहमदपूर नगरपरिषद क्षेत्रात कालपासून रात्री 11 ते पहाटे 5 वाजेपर्यंत जिल्हाधिकारी पृथ्वीराज बी पी यांच्या आदेशानुसार रात्रीची संचारबंदी लागू करण्यात आली आहे. अत्यावश्यक सेवा मात्र या आदेशातून वगळण्यात आल्या आहेत.

## लातूर ग्रामीण

लातूर जिल्ह्यातल्या ग्रामीण भागात गेल्या दोन दिवसांत 745 विद्यार्थ्यांची तपासणी करण्यात आली आहे. 3 विद्यार्थ्यांचा अहवाल सकरात्मक आढळून आला. शालेय विद्यार्थ्यांमध्ये कोरोनाचं वाढतं प्रमाण रोखता यावं म्हणून लातूर ग्रामीण मतदारसंघातील शालेय विद्यार्थ्यांची कोरोना तपासणी करण्याचे निर्देश आमदार धीरज देशमुख यांनी दिले होते. गेल्या काही दिवसांत राज्यातल्या विविध भागातील विद्यार्थ्यांना कोरोनाची लागण झाल्याच्या पार्श्वभूमीवर प्रतिबंधात्मक उपाय म्हणून शाळांमधील विद्यार्थ्यांची कोरोना तपासणी करणं आवश्यक वाटल्याचं देशमुख यांनी सांगितलं तर उर्वरित मतदारसंघातील इतर शाळांतील विद्यार्थ्यांची तपासणी आठवडाभरात पूर्ण केली जाणार आहे.

## लातूर यात्रा

लातूर जिल्ह्यात कोरोनाच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे यावर्षी ग्रामदैवत सिद्धेश्वर आणि रत्नेश्वर देवस्थानची महाशिवरात्री यात्रा पूर्णतः रद्द करण्यात आली आहे. धर्मादाय उपायुक्त श्रीमती यु.एस.पाटील यांच्या अध्यक्षतेखाली सोमवारी झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. दरम्यान महाशिवरात्रीनिमित्त मोजक्या भाविकांच्या उपस्थितीत पूजाअर्चा होणार असून शिवरात्रीला केला जाणारा दुग्धाभिषेक आणि पुष्पाभिषेक केवळ 5 व्यक्तींच्या उपस्थितीत होणार आहे. मानाच्या काठ्यांची मिरवणूकदेखील यावर्षी रद्द करण्यात आली असून या काठ्यांचे गाभाऱ्यातच पूजन केलं जाणार आहे. यात्रा कालावधीत केले जाणारे भजन-कीर्तन आणि काकडा हे देखील कोरोना विषयक नियम पाळून केले जाणार आहेत.

## वाशीम

वाशीम जिल्ह्यात कोरोना लसीच्या तिसऱ्या टप्प्याला सुरुवात झाल्यानंतर पहिल्या दिवशी जिल्ह्यातील 6 केंद्रावर 90 जेष्ठ नागरिकांनी लसीची पहिली मात्रा घेतली आहे. जिल्ह्यात गेल्या 15 दिवसात रुग्णांची संख्या प्रचंड वेगाने वाढत आहे. नागरिक कोरोना चाचणी

करून घेण्यास टाळाटाळ करीत असल्याने त्याचा सर्वाधिक धोका घरातील वयोवृद्ध नागरिकांना होत आहे.

याबरोबरच कोरोना महाराष्ट्र हे विशेष बातमीपत्र संपलं. कोरोनाची रुग्ण संख्या वाढू नं देणं आपल्याच हातात आहे. म्हणून हात वारंवार निर्जंतुक करा. चेहरा आणि मास्कला पुढील बाजूने हातांनी स्पर्श करु नका. गर्दी करणं आणि गर्दीत जाणं टाळा. सुरक्षित अंतर राखा आणि विश्वासार्ह बातम्यांसाठी ऐकत राहा, आकाशवाणी, नमस्कार.